# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
e-mail : desk4@dte.org.in Web : http://www.dte.org.in

कार्यालयीन आदेश

क्र. 4(3)/आस्था/कं.नि./2008/721
दिनांक : 15 DEC 2008

पहा : 1) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एससीटी 6506/(06/07)/तांशि 4, दिनांक 24 एप्रिल, 2007
2) शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. एससीटी 6507/(06/07)/तांशि 4, दिनांक 10.09.2007
3) कार्यालयीन आदेश क्र. 4(3)/आस्था/कं.नि./2008/28601, दि. 12.11.2008

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील रिक्त असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या पदावर खाली नमूद केलेल्या उमदेवारांची रु. 12,000/- (रुपये बारा हजार फक्त) या मासिक ठोक वेतनावर त्यांच्या नांवासमोरील दर्शविलेल्या पदांवर या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमदेवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीत आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नाव व पत्ता | नियुक्ती प्रवर्ग | कंत्राटी तत्वावर नियुक्तीचे पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | श्रीम. दिपाली भिमराव चव्हाण (३३०८), मु.पो. पेर्ले, ता. कराड, जि. सातारा पि. ४१५ १०९ | खुला | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता रसायनशास्त्र या पदावर |
| 2. | श्रीम. सुमिताकुमारी उमाशंकर शर्मा (३०२०), न्यु कॉलनी रोड, कन्नमवार वार्ड, बल्लारपूर, जि. चंद्रपूर पि. ४४२९०१ | खुला | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या अधिव्याख्याता रसायनशास्त्र या पदावर |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

1. **अ.क्र. 1 समोरील श्रीम. चव्हाण यांची संदर्भ क्र. 3 अन्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथील नियुक्ती रद्द करून वरील प्रमाणे नव्याने कंत्राटी नियुक्ती करण्यात येते आहे.**

2. **कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमदेवारांच्या नियुक्त्या या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमदेवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्ठात येतील.**

3. वरील उमदेवारांच्या कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या रु. 12,000/- (रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

4. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी संबंधित संस्थेत उपलब्ध असलेल्या करार पत्राच्या नमुन्यात रु. 100/- च्या स्टँम्प पेपरवर करारपत्र नियुक्त पदावर हजर होतेवेळी देणे बंधनकारक आहे, अन्यथा सदरचे आदेश रद्द ठरतील.

5. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमदेवारांच्या सेवा बदलीपात्र राहणार नाहीत, मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्‌भवल्यास त्यांची इतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बदली करण्यात येईल.

६. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांचे शैक्षणिक / अध्यापनाचे काम समाधानकारण असण्यावर अवलंबून राहीत व कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्ठात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.

७. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारां विरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार संबंधितांची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. **कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून 8 दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रुजू होणार नाहीत त्यांच्या नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्ठात येईल, त्याबाबत पुनर्विचार करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.**

९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्ठात येतील.

१०. प्रस्तुत नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधितांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत.

११. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या उमदेवारांनी अध्यापनाशिवाय वरीष्ठांनी सोपविलेली तद्नुषंगीक इतर प्रशासकीय कामे करणे बंधनकारक राहील.

१२. संबधितांची नियुक्ती जर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमदेवार उपलब्ध न झाल्यामुळे त्या पदावर केलेली असेल तर त्यांची सेवा भविष्यात सदर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमदेवार उपलब्ध झाल्यास समाप्त करण्यात येईल.

१३. **कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेसंबधी, जात व जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) व उन्नत / उच्च उत्पन्न गटात मोड नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट) (लागू असल्यास) या प्रमाणपत्राच्या छायांकीत 1 संच मुळ प्रमाणपत्रासह नियुक्तीच्या पदावर हजर होतेवेळी प्राचार्यांना सादर करावा. उमदेवारांनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज करतांना दिलेली माहिती व प्रत्यक्ष प्रमाणपत्रांची माहिती यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांचे नियुक्ती आदेश आपोआप संपुष्ठात येतील, याची नोंद घेण्यात यावी.**

१४. संबंधितांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणतयाही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे संबंधितांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१५. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यांत येईल.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:
मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी सादर

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१. कोषागार अधिकारी (मानार्थ) (प्राचार्यामार्फत), औरंगाबाद व कराड
२. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व कराड
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद व पुणे
४. संबंधित व्यक्ती (डाक नोंद पोच देय)
५. कार्यासन क्रमांक ४, निवड नस्तीस.